


साप्ताहिक

# खबर

से हकिकत तक

KHABAR SE HAKIKAT TAK





● Email : shirishkumarsherkhane@gmail.com ▌संपादक : शिरीषकुमार तुकाराम शेरखाने, मो.९०४९८४४४१२ ● WEBSITE : https://khabarsehakikattak.in

लातूर मराठी साप्ताहिक वर्ष २ रे. अंक १४ वा. सोमवार दि.०९ ते १५ सप्टेंबर २०२४ RNI No. : MAHMAR/2023/86200 किंमत २ रुपये पाने : ४


## पत्रकारांना सूत्रे विचारण्याचा अधिकार नाही, सर्वोच्च न्यायालयाचा पोलीस अधिकाऱ्यांना इशारा

रायपूर : देशाच्या सर्वोच्च न्यायालयाने पुन्हा एकदा पोलीस प्रशासन आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांवर जोरदार निशाणा साधला. मुख्य न्यायमूर्ती डीवाय चंद्रचूर्ण यांच्या खंडपीठाने सांगितले की, घटनेच्या कलम १९ आणि २२ नुसार पोलीस कोणत्याही पत्रकाराची सूत्रे विचारू शकत नाहीत आणि पत्रकारांच्या स्वातंत्र्याच्या मूलभूत अधिकारांच्या विरोधात न्यायालयही विचारू शकत नाही. जोपर्यंत तपास आणि ठोस पुराव्याशिवाय पत्रकारांवर दाखल झालेले गुन्हे आणि साक्ष तपासली जात नाहीत. आजकाल पोलीस पत्रकारांच्या स्वातंत्र्यावर गदा आणत असल्याचे दिसून येत आहे कारण बहुतांश घटनांमध्ये पोलीस स्वतःला चांगले बनवण्यासाठी असे करतात, या संदर्भात उच्च न्यायालयाने आता पोलीस असे करताना आपली कठोर भूमिका दाखवण्यास सांगितले आहे. तसे असेल तर न्यायालयाचा अवमान केल्याचा गुन्हा दाखल होऊ शकतो. कोणतीही बातमी छापण्यासाठी पत्रकार त्यांच्या स्रोतांचा वापर करतात हे लक्षात घेण्याजोगे आहे. परंतु अनेक वेळा भ्रष्ट राजकीय माफिया आणि पोलीस संघटित गुन्हेगारीच्या धर्तीवर पत्रकारांना त्रास देत असल्याचे दिसून येते. छत्तीसगडमधील महादेव अप घोटाळा उघडकीस आल्याने छत्तीसगड पोलिसांनी भोपाळमधील महिला पत्रकाराला पकडण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले, मात्र महिला पत्रकाराने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. आणि सर्वोच्च न्यायालयाच्या या मार्गदर्शक तत्त्वाचा आधार घेतला होता.



फॉर्म्युल्यामुळे तुम्ही कोणत्याही पत्रकाराला अटक करू शकत नाही, असे न्यायालयाने सांगितले, पत्रकारांनी ही बातमी जास्तीत जास्त व्हायरल करण्याची गरज आहे जेणेकरून तुम्हाला तुमच्या हक्कांची जाणीव होईल.

## ड्रायव्हिंगबाबत लवकरच येतोय कडक नियम;

## ड्रायव्हरने ८ तासाच्यावर गाडी चालवू नये!

अमरावती : पेट्रोल डिझेल संदर्भात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी मोठं वक्तव्य केलेय. अमरावती येथील ड्रायव्हिंग स्कूलच्या उद्घाटन सोहळ्यात ते बोलत होते. देशातून पेट्रोल आणि डिझेल संपवण्याचा मी संकल्प केला असल्याचे नितीन गडकरी यांनी केला आहे.

यावेळी बोलताना त्यांनी रस्ते अपघातामध्ये दरवर्षी मृत्यू पावणाऱ्यांबद्दल आणि त्याच्याबाबतच्या कारणावरही त्यांनी भाष्य केले. भारतामधून येणाऱ्या काळात पेट्रोल डिझेल हद्दपार करणार आहे. तसा मी संकल्प केला आहे. येणाऱ्या काळात वाहतूक पद्धतीत ही बदलत जाणार आहे. मेळघाटसारख्या परिसरात ड्रायव्हर ट्रेनिंग सेंटर सुरू होणं गरजेचे आहे देशात ड्रायव्हरची मोठ्या प्रमाणात कमतरता आहे. येणाऱ्या काळात ड्रायव्हरने फक्त आठ तास ड्रायव्हिंग करावे असा नियम करणार असल्याचेही यावेळी



गडकरी म्हणाले.आपल्या देशात साडेचार कोटी रोजगार देणारी ऑटोमोबाईल इंडस्ट्री आहे. यामध्ये दिवसागणिक वाढ होत आहे. येणाऱ्या काळात ऑटोमोबाईल इंडस्ट्रीमध्ये भारत जगात पहिला क्रमांकावर जाईल, असा विश्वास गडकरींनी यावेळी व्यक्त केला.

देशात शेतकऱ्यांना समृद्ध करण्याकरता इथेनॉल पॉलिसी आणली, ही इकॉनॉमी दोन लाख कोटींवर पोहोचली आहे. येणाऱ्या काळात ट्रान्सपोर्ट सेक्टर बदलत चालले असून इलेक्ट्रिक व्हेईकल व इथून वर चालणारे वाहन रस्त्यावर धाव लागतील. ज्यावेळी मुंबई-पुणे महामार्ग बांधण्याची मला संधी मिळाली. दोन तासांत जाता येईल, असे सांगितले होते. त्यावर माझी खिल्ली उडवली गेली. पण तुम्ही वास्तव पाहत आहात. लोक दोन तासांत मुंबईवरुन पुण्याला जाऊ शकता. देशात आशाप्रकारचे अनेक रस्ते तयार केले आहेत. काश्मीर ते कन्याकुमारी हा रस्ता तयार केलाय. त्यामध्ये जोडरस्ते तयार केले आहेत. महाराष्ट्रासह अनेक राज्यांना याचा फायदा होणार आहे. भारतामध्ये लवकरच ४०० इथेनॉल पंप सुरू करण्याची योजना आहे. इथेनॉल वापरामुळे ट्रान्सपोर्ट स्वस्त होईल, असेही गडकरी यावेळी म्हणाले.

## ६ हजाराची लाच; शाखा अभियंत्यास ३ वर्षाचा कारावास

लातूर: लातूर सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत) येथे कार्यरत असलेले शाखा अभियंता दत्तात्रय राजाराम पडवळ (वय ४६) यास ६००० रूपयांची लाच स्वीकारल्याप्रकरणी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश व्ही. व्ही. पाटील यांनी ३ वर्षे कारावास व ५००० रूपये दंडाची शिक्षा ठोठावली आहे. नमुद गुन्हयात मुळ तक्रारदार यांनी सार्वजनीक बांधकाम विद्युत विभागा मार्फत पशु संवर्धन विभागात चार ए-सी- बसविले असुन त्याचे बिल दि. १६ जानेवारी २०१६ रोजी मिळाले होते- तक्रारदार यांनी सदर बिलाचे कमिशन दिले नव्हते तसेच दि.१८ नोव्हेंबर २०१५ रोजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय परिसरातील वातानुकुल यंत्राचे कॉम्प्रेसर बदलण्याचे काम मिळाले होते- केलेल्या कामाची एम.बी.बिल मंजुरीसाठी देण्यात आले होते परंतु पहिल्या बिलाचे कमिशन १०,००० /- रूपये न दिल्यामुळे दुसरे बिल काढण्याचे कामासाठी पहिल्या कामाचे १०,०००/- रूपये ची मागणी करून तडजोडीअंती ६,०००/- रूपये घेण्याचे मान्य करून सदर लाचेची रक्कम स्विकारली म्हणून गुन्हा दाखल करण्यात आला होता. नमुद गुन्ह्याचे साक्षी पुरावा ग्राह्य धरून मा.न्यायालयाने नमुद आरोपी लोकसेवकास दोषी ठरविले आहे.



## सर्वोच्च न्यायालयाला मिळाला अधिकृत 'निळा ध्वज'

नवी दिल्ली : भारताच्या राष्ट्रपती महामहीम द्रौपदी मुर्मू यांनी आज सर्वोच्च न्यायालयाच्या नव्या ध्वजाचे व लोगोचे अनावरण केले. या ध्वजावर अशोकचक्र, सर्वोच न्यायालयाची इमारत आणि संविधानाचे पुस्तक आहे. जे न्याय, समता आणि बंधुता यांचे प्रतीक आहे. नवीन ध्वज हा भारतीय न्यायव्यवस्थेच्या नवीन दिशादर्शकांचा संकेत देतो. ज्यामध्ये अधिक पारदर्शकता, समर्पण आणि न्यायिक प्रक्रियेत सुधारणा करण्यावर भर देण्यात आलेला आहे. नवीन ध्वजाच्या अनावरण सोहळ्याच्या निमित्ताने भारताच्या राष्ट्रपती महामहीम द्रौपदी मुर्मू यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या ऐतिहासिक भूमिकेची प्रशंसा केली.



राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू जी यांचे स्वागत करताना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे मॅडम व लातूर जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे सर...



राज्याचे माजी मंत्री सहकार महार्षी दिलीपराव देशमुख यांना साखर उद्योग गौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा विशाल वि.वि.का.सहकारी सोसायटी चाकूरचे चेअरमन डॉ.गोविंदराव माकणे व्हा. चेअरमन बालाजी तलवारे व संचालक मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

## आंतरराष्ट्रीय संस्थेच्यावतीने सर्वोत्कृष्ट कामगिरीबद्दल ॲड.आशा शेरखाने यांचा सत्कार



छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी): अन्न वाचवा समिती तर्फे ॲड.आशा शेरखाने यांचा सत्कार करण्यात आला. ॲड. आशा शेरखाने या महिला व बाल विकास समिती च्या अध्यक्ष असून त्यांना आंतरराष्ट्रीय संस्थेकडून बालविकास समिती च्या सर्वोत्कृष्ट कामगिरी बद्दल देश पातळीवर पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. त्यांच्या हया आगळ्यावेगळ्या सेवेसाठी अन्न वाचवा समितीच्या अच्छाई को सलाम हया अभियाना अंतर्गत त्यांचा सत्कार करण्यात आला.

तसेच अन्न वाचवा समितीचे जेष्ठ सभासद श्री निलेश बनसोड ह्यांनी दिवान देवडी हया भागात एक छोटेसे दुकान टाकून तेथे पोस्टर्स, बॅनर्स बनविण्याचे काम करीत असताना स्वकर्तृत्वावर कठोर परिश्रम करून एम. जी. एम. विद्यापीठात असिस्टंट प्रोफेसर म्हणून निवडले गेले म्हणून अन्न वाचवा समिती तर्फे त्यांचा ही सत्कार करण्यात आला. हया सत्कार कार्यक्रमाला घाटी रुग्णालयात कान नाक घसा हया विभागाचे विभाग प्रमुख डॉ. सुनिल देशमुख सर, कमलनयन बजाज संस्थेच्या नर्सिंग कॉलेज च्या प्राचार्या डॉ. सुप्रिया चिंचपुरे आणि अन्न वाचवा समिती चे संस्थापक अध्यक्ष अनंत मोताळे, ड. श्रीचंद जिग्यासी, अजित राणा, अशोक पोरे, नागेश गव्हले, रूपाली वाहूळे, रसिका वाणी, राजेंद्र वाहूळे, लक्ष्मण परदेशी, सुधा दरबस्तवार, जया पाटील इत्यादी सभासद उपस्थित होते.

## सामाजिक बांधिलकी जपत मलाबार गोल्ड अँड डायमंडस् लातूर शॉपचा शिक्षक दिनी नवीन उपक्रम



लातूर : देशाची भावी पिढी निर्माण करणाऱ्या शैक्षणिक क्षेत्रातील आदर्श शिक्षक यांना पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. शिक्षक हा ज्ञानाचे धडे देत असताना समाजाची जाणीव ठेवून विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत असतात यांची कामगिरी लक्षात घेऊन गुणवंत आणि आदर्श शिक्षक यांचा लातूर मलाभार गोल्ड अँड डायमंडस् शॉपचे स्टोअर मॅनेजर तानाजी जगताप एडमिन नजीर सर आणि मलाभार स्टॉप चे सर्व सहकारी यांनी ५ सप्टेंबर शिक्षक दिनाच्या निमित्ताने ज्येष्ठ शिक्षक आणि आदर्श शिक्षक यांचा शाल श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. याप्रसंगी लातूर जिल्ह्यातील सर्व शिक्षक शिक्षिका आणि व्यापारी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राष्ट्रपतीच्या हस्ते सर्वोत्कृष्ट भाषण पुरस्कार मिळाल्याबद्दल आ.अभिमन्यू पवार यांचा भव्य नागरी सत्कार

कासार सिरसी - राष्ट्रपती द्रौपदी मरमू यांच्या हस्ते यावर्षीचा विधानसभा उत्कृष्ट भाषणाचा पुरस्कार औसा विधानसभेचे आमदार अभिमन्यू पवार यांना मिळाल्याबद्दल कासार सिरसी (पान ४ वर)



## आदिगुरू बचत गटाच्यावतीने प्रा.डॉ.चंद्रकांत शेरखाने यांचा सत्कार



लातूर(प्रतिनिधी): महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा, त्रिराज्यस्तरीय, कै.बसवंत नागु शिंगाडे सामाजिक सेवाभावी संस्था (ट्रस्ट) यांच्यावतीने समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी विविध क्षेत्रात उल्लेखनीय केलेल्या कार्याचा गौरव म्हणून रेणापूर येथील शिवाजी महाविद्यालयातील मराठी विषयाचे प्राध्यापक डॉ. चंद्रकांत जानबा शेरखाने यांची निवड राष्ट्रीय प्रेरणा गौरव पुरस्कार २०२४ करिता करण्यात आली आहे. हा पुरस्कार रविवार दिनांक १५ सप्टेंबर २०२४ रोजी कोल्हापूर येथे दिला जाणार आहे. त्या अनुषंगाने लातूर जिल्हा वीरशैव कक्कया समाज ज्येष्ठ नागरिक आदिगुरू बचत गटाचे अध्यक्ष मा. शंकरराव इंगळे यांनी शाल, श्रीफळ, पुष्पहार, पुष्पगुच्छ व स्वीट देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी आदिगुरू बचत गटाचे ज्येष्ठ सन्माननीय सर्व पदाधिकारी रमेश साबणे, दत्तात्रय सोनकवडे, श्रीकिशन कावळे, सल्लागार मार्गदर्शक, अप्पाराव कावळे, गणेश कावळे, भिवाजी कावळे, प्रभाकर कोकणे, मनोहर कोकणे, शिरीषकुमार शेरखाने, ॲड. बाळासाहेब कटके,पप्पू सावळकर, गणपत कावळे, परमेश्वर कावळे, सतीश कोकणे, पंडित दगडू कावळे, मारुती कावळे, बालाजी कावळे, आधी सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डॉ.बी.आर.आंबेडकर विद्यार्थी सहकारी बँकेचे उद्घाटन!



लातूर : महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत चालणाऱ्या अनु.जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा एम आय डी सी लातूर येथे स्थापन करण्यात आली असून डॉ. बी.आर. आंबेडकर विद्यार्थी सहकारी बँकेचे उद्घाटन बँक ऑफ महाराष्ट्र शाखाचे मॅनेजर विहंग नारंगकर यांच्या हस्ते करण्यात आले.

सहकारी बँकेचे उद्दिष्टे विद्यार्थ्यांना आर्थिक साक्षर करणे , विद्यार्थ्यांना आर्थिक बचतीची सवय जडावी व राष्ट्रीयकृत बँकांचे व्यवहार कसे चालतात तसेच भविष्यातील बँकींग क्षेत्रातील संधी विद्यार्थ्यांना माहित व्हाव्यात या हेतूने विद्यार्थी सहकारी बँकेची स्थापना करण्यामागची भूमिका बँकेचे मार्गदर्शक अंबादास धिवार यांनी विषद केली. बँक मॅनेजर म्हणून प्रतीक साबळे तर कॅशिअर म्हणून धम्मदीप सोनटक्के या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. विद्यार्थी सहकारी बँकेचे संपूर्ण (पान ३ वर)

## श्री महात्मा बसेश्वर शिक्षण संस्थेला महिला महाविद्यालय निर्मितीसाठी प्रयत्न करणार-खासदार डॉ.अजितजी गोपछडे

लातूर : लातूर शहरातील नामांकित श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर यांना लवकरच महिला महाविद्यालयाचे मान्यता देण्यासाठी प्रयत्न करणार, असे आश्वासन राज्यसभेचे खासदार डॉ. अजितजी गोपछडे यांनी केले. ते येथील महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात आयोजित विरशैव लिंगायत सन्मान यात्रेअंतर्गत श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था विश्वस्तांचा सन्मान आणि शिक्षक शिकेत्तर कर्मचारी संवाद समारंभात प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. यावेळी विचारपीठावर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे हे होते. तर विशेष उपस्थिती म्हणून भाजपा निवडणूक प्रवास आयोजिका (लातूर शहर विधानसभा) च्या सौ डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, सचिव माधवराव पाटील टाकळीकर, संचालक राजेश्वर बुके, संचालक बसवराज (राजू) येरटे, संचालक बाबुराव तरगुडे, सन्मान यात्रेचे प्रमुख संयोजक नितीनभाऊ शेटे, राष्ट्रीय जंगम समाजाचे अध्यक्ष श्रावण जंगम, निखिल माळगे, बालाजी पाटील, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, उपप्राचार्य प्रा.



संजय पवार, उपप्राचार्य प्रा. बालाजी जाधव, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, कार्यालयीन प्रमुख नामदेव बेंदरगे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी जगत् ज्योती महात्मा बसवेश्वरांचे प्रतिमापूजन आणि प्रा. विश्वनाथ स्वामी, प्रा. गोविंद पवार आणि त्यांच्या चमू सादर केलेल्या स्वागत गीताने झाली. पुढे बोलताना खासदार डॉ. अजित गोपछडे म्हणाले की, महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था ही महात्मा बसवण्णाच्या जातीअंताचा लढा पुढे चालवणारी शैक्षणिक संस्था असून सामाजिक समरसतेचा विचार या संस्थेमार्फत केला जातो. दीन दलित, उपेक्षित-वंचितांचा सन्मान येथे केला जातो.

लिंगायतातील सर्व भेदभाव विसरून समाज एकत्रित आला पाहिजे. धर्मकारण, राजकारण, संस्कृती, उद्योग, ज्ञान, विज्ञान-तंत्रज्ञान या क्षेत्रात भरीव कामगिरी करून समाजाने आपली संघटन शक्ती दाखवली पाहिजे. जगत् ज्योती महात्मा बसवेश्वरांनी इसवी सनाच्या १२ व्या शतकात अनुभव मंटपाच्या माध्यमातून स्त्री-पुरुष समानता नोंदवली, त्यांनी (पान ३ वर)

# संपादकीय....

# गौरी पूजन



ज्येष्ठागौरी पूजन महाराष्ट्रात भिन्न-भिन्न रितीने केले जाते. अनुराधा नक्षत्रावर ज्येष्ठागौरीचे आवाहन, ज्येष्ठा नक्षत्रावर तिचे पूजन आणि मूळ नक्षत्रावर तिचे विसर्जन, असे हे तीन दिवसांचे मूळ व्रत आहे. याला 'ज्येष्ठागौरी पूजन' असे म्हटले जाते. काही गावांत या गौरी सोन्या-चांदीचे वा पितळेचे मुखवटे धारण करणाऱ्या असतात. त्या मूर्तींना चांगल्या साड्या नेसवून दागदागिन्यांनी नटवले जाते. तर काही ठिकाणी केवळ कागदावर गौरीचे चित्र काढून किंवा छापील कागद आणून तिचे पूजन केले जाते. कित्येक गावांत अशी प्रथा आहे की, नदीतील पाच खडे किंवा लहान दगड आणावयाचे आणि तेच पूजावयाचे. गंमत अशी की, कित्येक ठिकाणी तर मातीचे लहान लहान घट आणून त्यात हळद बांधलेला दोरा, खारीक आणि खोबरे घालतात आणि ते घट एकावर एक ठेवून ती उतरंड गौरी म्हणून पूजतात.

श्रावणातली व्रतं वैकल्याची धामधूम संपत असतानाच गृहिणींना वेध लागतात गौरी-गणपतीचे! आमच्या लहानपणी गौरीमाहात्म्य मोठे. अजूनही आहे. घरातले पितळेचे गोंडस मुखवटे निगुतीने बांधून ठेवलेल्या बोचक्यातून काढायचे. चिंच-रांगोळीने उजळायचे. मग चुना, कोळसा या रंगांनी डोळे सजीव व्हायचे आणि ओल्या लाल रंगाने ओठ रंगले की गौरी माहेरी यायला सज्ज व्हायच्या. अंगणात तुळशीपासून पूजास्थापनेच्या घरातल्या जागेपर्यंत सडा रांगोळ्यांनी घर सजायचे. लक्ष्मीची रांगोळीची पावले आणि ओल्या हळदी-कुंकवांच्या हातोप्याने गौरींचा रस्ता शोभिवंत व्हायचा. तुळशीपासून डोईवर खणाने झाकलेले मुखवटे प्रत्येक रांगोळीच्या पावलांवर टेकवीत सवाष्णींनी अदबशीर घरात आणायचे. दर टप्प्यावर - 'लक्ष्मी आली, सोन्याच्या पावली।' हा लोकमंत्र बायकांच्या मनातून उत्साहाने उमटत राहायचा. गौरीला प्रथम चूल - भानवशीजवळ न्यायचे - एकजण म्हणे,

**'गौरी गौरी, काय पाहतेस?'**

उत्तर यायचं, 'चूल-भानवस!' - करीत करीत मग दूधदुभते, गाई-गुरांचा गोठा, धान्याची कोठारे (डबे), घरातल्या सोन्या-रुप्याच्या (असल्यास) तिजोऱ्या, कपाटे, पेट्या...असं सगळं घर फिरून झालं की गौरी मुख्य जागी स्थानापन्न व्हायच्या. ''लाडके गौराय कधी येसी पानी पडलं नय भारलं भादव्याला येणं को-या सुपात येणं झणकत येणं'' खांद्यापर्यंत आकाराच्या एक-दीड फुटाच्या सालंकृत, साड्या नेसवलेल्या साचांवर मुखवटे चढवले की मूर्तिमंत गौरी प्रकट व्हायच्या. काही ठिकाणी नारळाला/ तांब्याला कुंची घालून बाळं ठेवतात. मग पुढचे दोन-अडीच दिवस या माहेरवाशिणींच्या कौतुकात घरातल्या सासुरवाशिणी आणि खास गौरींसाठी आलेल्या माहेरवाशिणी रंगून जायच्या. रोज सकाळ-संध्याकाळ फुले, गजरे, आरती, नैवेद्याच्या परोपरी आणि मुख्य म्हणजे गौरींची सालंकृत रूपे आणि भोवतालची सजावट यात बायकांच्या पारंपरिक कलाकौशल्यांची उधळण झालेली असायची. आज- अजूनही थोड्याफार फरकाने ज्या घरी गौरी बसतात, त्या बहुसंख्य घरांत असंच वातावरण असतं. गौरींचा उत्सव प्रामुख्याने स्त्रीप्रधान! गौरी अनुराधा नक्षत्रावर येत असल्या, तरी तिचा दिग्विजयी पुत्र मात्र तिथीनुसार चतुर्थीच्या दिवशीच आलेला असतो. जाताना कित्येक ठिकाणी विश्वमाऊली गौरी आपल्या पुत्राला बरोबर घेऊन जाते. ज्या घरी गौरी पूजनाची प्रथा नाही तिथे मात्र गणपतीचा मुक्काम हा गौरी विसर्जनानंतही असू शकतो. दोन, चार, सहा, अकरा किंवा एकवीस दिवसही असा हौसेखातर किंवा श्रद्धेपोटी गणपती घरात ठेवला जातो. मायमाऊली गौरी नक्षत्रावर भर देते, तर पुत्र तिथीप्राधान्य मानतो. हे व्यक्ति स्वातंत्र्य आपल्याकडे पूर्वीपासूनच आहे.

**ज्येष्ठागौरी कथा ज्येष्ठागौरी आख्यायिका आणि इतिहास**

हिंदू देवताशास्त्रात तसेच समाजजीवनात गौरी हे शिवाच्या शक्तीचे आणि गणेशाच्या आईचे रूप मानले गेले आहे. अपराजितपृच्छा या ग्रंथामध्ये द्वादशगौरींचा उल्लेख येतो. अग्निपुराणामध्ये गौरी मूर्तीचे सामूहिक पूजन केले जाई असे सांगितले आहे. लातूर येथील नीलकंठेश्वर मंदिरात शिवाची आणि गौरीची एक सुंदर कोरीव प्रतिमा आहे. त्यांच्या पायाशी एक घोरपड दाखवली आहे. गौरीच्या डाव्या हातात बीजपूरक आहे, केसांवर फुलांची वेणी आहे. ही शिव परिवारातील देवता असून कनोज येथे हिचे मंदिर आहे. एकदा असुरांच्या त्रासाला कंटाळून सर्व स्त्रिया महालक्ष्मी गौरीकडे गेल्या आणि त्यांनी आपले सौभाग्य अक्षय्य करण्याविषयी तिची प्रार्थना केली. त्याला अनुसरून गौरीने असुरांचा संहार केला व शरण आलेल्या स्त्रियांच्या पतींना व पृथ्वीवरील प्राण्यांना सुखी केले.महालक्ष्मीच्या कृपा प्रसादाने आपापल्या सौभाग्य प्राप्त झाले अशी आख्यायिका प्रचलित आहे ; म्हणून तेव्हापासून सर्व स्त्रिया महालक्ष्मी गौरीची पूजा करू लागल्या.

**ज्येष्ठागौरी व्रत करण्याची पद्धत**

हे व्रत तीन दिवस चालते. प्रांतभेदानुसार हे व्रत करण्याच्या विविध पद्धती आहेत. यामध्ये धातूची, मातीची प्रतिमा करून अथवा कागदावर श्री महालक्ष्मीचे चित्र काढून, तर काही ठिकाणी नदीकाठचे पाच लहान खडे आणून त्यांचे गौरी म्हणून पूजन केले जाते. (महाराष्ट्रात बहुतांश ठिकाणी पाच लहान मडक्यांची उतरंड रचून त्यावर गौरीचा मातीचा मुखवटा बसवतात. काही ठिकाणी सुवासिक फुले येणार्या वनस्पतीची रोपे अथवा तेरड्याची रोपे एकत्र बांधून त्यांची प्रतिमा बनवतात आणि त्यावर मातीचा मुखवटा चढवतात. त्या मूर्तीला साडी नेसवून अलंकारांनी सजवतात. - ही एक रूढी आहे.)

**गौरी आवाहन (दिवस पहिला)**

आपापल्या परंपरेप्रमाणे घराच्या उंबऱ्यातून आत आणताना, जिच्या हातात गौरी असतील त्या बाईचे पाय दुधाने व पाण्याने धुतात आणि त्यांवर कुंकवाचे स्वस्तिक काढतात. घराच्या दरवाज्यापासून ते जिथे गौरी बसवायच्या त्या जागेपर्यंत लक्ष्मीच्या पायांचे ठसे उमटवत उमटवत गौरींचे मुखवटे आणतात. त्यावेळी ताट चमच्याने किंवा घंटेने वाजवत आवाज केला जातो. यानंतर त्यांची स्थापना करण्यापूर्वी त्यांना घरातील समृद्धी, दुध-दुभत्याची जागा इ. गोष्टी दाखविण्याची प्रथा आहे. तेथे त्यांचे आशीर्वाद मिळून ऐश्वर्य नांदो अशी प्रार्थना करतात.काही ठिकाणी लोक तेरड्याची रोपे एकत्र बांधून त्यांची प्रतिमा बनवितात व तिच्यावर मातीचा मुखवटा चढवितात. नंतर त्या मूर्तीला साडी नेसवून दागदागिन्यांनी सजवितात.पहिल्या दिवशी संध्याकाळी गौरीला भाजी-भाकरीचा नैवैद्य दाखवण्याची पद्धत काही भागात विशेषत: पश्चिम महाराष्ट्रात आहे.

**गौरीपूजन (दिवस दुसरा)**

दुसर्या दिवशी म्हणजेच ज्येष्ठा नक्षत्रावर गौरींची पूजा केली जाते. सकाळी गौरींची/महालक्ष्मीची पूजा-आरती करून केलेल्या फराळाचा (रव्याचा लाडू, बेसनलाडू, करंजी, चकली, शेव, गुळपापडीचा लाडू) नैवेद्य दाखवतात. नंतर संध्याकाळी आरती करतात. पुरणपोळी, ज्वारीच्या पिठाची आंबील, आंबाडीची भाजी, सोळा भाज्यांची एकत्र भाजी, दिवेफळ वगैरे पदार्थांचा नैवेद्यात समावेश असतो. नैवेद्यात शेंगदाणा आणि डाळीची चटणी, पंचामृत, पडवळ घालून केलेली ताकाची कढी, कटाची आमटी, वेगवेगळ्या प्रकारची भजी, पापड, लोणचे इत्यादी. केलेले सर्व पदार्थ केळीच्या पानावर ठेवतात.महाराष्ट्रात सायंकाळी महिलांचा हळदीकुंकू कार्यक्रम केला जातो. दर्शनाला आलेल्या महिला व मुलींचे आदरपूर्वक स्वागत करण्याची पद्धती प्रचलित आहे. कोणत्याही प्रदेशात आणि जातीजमातीत सोळा प्रकारच्या भाज्या हव्यातच! त्यात अनेक पालेभाज्या आणि दुधी, दोडका अशा वेलभाज्या! भरपूर येतातच ना त्या पावसाळ्यात! मग गोडा नैवेद्य म्हणजे घाटावर पुरणपोळी, कोकणात घावन-घाटले, तर काही ठिकाणी चक्क तिखट (सामिष) नैवेद्य हवाच! जुन्या रीतीप्रमाणे काही समुदायात मद्यही आवश्यक! काहीच नसेल तर जमातीचा 'पुरोहित' (तिखट) नैवेद्यावर चार थेंब मद्य शिंपडणारच!

विदर्भातल्या गौरींचा (लक्ष्म्यांचा) नैवेद्यही वऱ्हाडी अघळपघळ प्रवृत्तीसारखाच! जोंधळ्याची आंबील हवीच! बहुधा गोड. कधी तिखट-खारी. तीही सत्यनारायणाच्या प्रसादासारखी सव्वा पटीत! सव्वा पावशेर/ शेर/पायली! आंबील शिजवलेलं मोठ्ठं पातेलं तसंच लक्ष्म्यांपुढे! मग पुरणपोळी, १६ भाज्या वगैरे आहेच! जेवायला खूप लोकांना बोलवायचं. आंबिलीचे पावित्र्य मोठे. इथे तिथे हात धुवायचा नाही- अंगणात एका खास खड्ड्यातच हात धुवायचे! 'समुद्र' म्हणतात त्याला. नंतर तो खड्डा बुजवायचा! हळदी-कुंकवाला येणारी प्रत्येकजण लक्ष्मीची खणा-नारळांची ओटी आणि ऐपतीनुसार धान्य घेऊन येणार! पुन्हा गृहिणीने ती सगळी 'रास' घटस्थापनेपूर्वी घरातच पै-पाहुण्यांसाठी पदार्थ खाऊ घालूनच संपवायची. उचलून घराबाहेर काही न्यायचं नाही.

अनेक ठिकाणी नैवेद्याच्या वेळी कणकेचे १६, कुठे ३२ दिवे आणि मुठे करून केळीच्या पानाभोवती ठेवायचे! नैवेद्य केळीच्या पानावरच वाढायचा. वाढून झालं की वऱ्हाडात त्या खोलीचं दार काही काळ बंद ठेवतात. आत लक्ष्म्या जेवतात ना! दार उघडलं की बारकाईनं पान बघायचं. कोणकोणते पदार्थ उष्टावले गेलेत? सगळी गंभीर गंमत!

**एक संकेत मात्र सगळीकडे! गौरी, लक्ष्मी घरात असेपर्यंत घरातला पैसा बाहेर द्यायचा नाही. विसर्जन (दिवस तिसरा)**

तिसऱ्या दिवशी म्हणजेच मूळ नक्षत्रावर गौरींचे/महालक्ष्मींचे विसर्जन करतात. त्या दिवशी सकाळी पोवत्याच्या/ सुताच्या गाठी पाडतात. त्या सुतात हळदीकुंकू, सुकामेवा, बेलफळ, फुले, झेंडूची पाने, काशीफळाचे फूल, रेशमी धागा असे एक एक जिन्नस घालून गाठी पाडतात. यांमध्ये हळदीकुंकू, रेशमी सूत, झेंडूची पाने, काशीफळाचे फूल हे महत्त्वाच्या वस्तू असतात. नंतर गौरींची/ महालक्ष्मींची पूजा आणि आरती करतात. गोड शेवयाची खीर, उडीद डाळीचा भाजलेला पापड याचा नैवेद्य दाखवतात. या तिसऱ्या दिवशी गौरींच्या/ महालक्ष्मींच्या चेहऱ्यावर एक प्रकारची उदासीनता दिसून येते. गौरींची पूजा, आरती करून पुढील वर्षी येण्याचे आमंत्रण देऊन त्यांचा निरोप घेतला जातो, आणि त्यांचे विसर्जन केले जाते. (धातूच्या किंवा कायम स्वरूपाच्या मूर्ती असतील तर त्यांचे विसर्जन करत नाहीत.) गौरींचे पाण्यात विसर्जन केल्यावर परत येताना थोडी वाळू घरी आणून ती सर्व घरभर व परसातल्या झाडांवर टाकतात. त्यायोगे घरात समृद्धी नांदते व झाडाझुडुपांचे कीटकांपासून संरक्षण होते अशी समजूत आहे.

**दोरकाची पूजा**

या तिसऱ्या दिवशी महाराष्टातील ग्रामीण बहुजनसमाजात गौरींच्या पूजेबरोबरच सुताच्या गुंड्याला सोळा गाठी देऊन त्याचीही पूजा करतात. तो गुंडा मग हळदीने रंगवून त्यातला दोरा घरातल्या सुवासिनी आपल्या गळ्याभोवती बांधतात व नवीन पीक येईपर्यंत गळ्यात ठेवतात.आश्विन वद्य अष्टमीला तो गळ्यातून काढून त्याची पूजा करतात. या दोऱ्यालाच महालक्ष्मी समजतात.

**महाराष्ट्र व महाराष्ट्रा बाहेर गौरी पूजन**

मराठवाड्यात मात्र काहीशी वेगळी पद्धत पाहावयास मिळते. 'गौरी' असा उल्लेख न करता तिला 'महालक्ष्मी' असं संबोधलं जातं आणि महालक्ष्मीच्या रूपातच तिची पूजा केली जाते. मराठवाड्यात नव्यानं लग्न झालेली मुलगी या दिवशी आवर्जून माहेरी येते. मुलीच्या लग्नानंतर पहिल्या महालक्ष्मी सणाच्या वेळी तिचे आई-वडील 'महालक्ष्म्या' घेऊन मुलीच्या घरी (सासरी) जातात. नव्या सुपात ठेवून या महालक्ष्म्या सासरच्या घरी सन्मानानं दिल्या जातात. सासरची मंडळीही आपल्या घरी 'लक्ष्मी' आली या भावनेनं देवीच्या या प्रतिमांचा स्वीकार करतात आणि सुनेलाही महालक्ष्मीच्या रूप मानतात.

पूर्वी वर्षभर सुनेला सासूरवास सहन करावा लागत असला तरी या तीन दिवसांच्या काळात मात्र तिला अत्यंत सन्मानानं वागवलं जायचं. आता सासूरवासाचं प्रमाण कमी झालं असलं तरी या तीन दिवसांत सुनेचा सन्मान मात्र कायम आहे. दिवाळीत जेवढे फराळाचे पदार्थ केले जातात तितकेच पदार्थ या सणाच्या निमित्तानं केले जातात. मराठवाड्यात आणि विदर्भातील उत्सवात बरंच साम्य असल्याचं दिसून येतं. विदर्भात ज्येष्ठा गौरी आणि कनिष्ठा गौरी असाही एक प्रकार आहे. ज्येष्ठा गौरी श्रीरावणातच येतात. तर कनिष्ठा गौरी भाद्रपद महिन्यात येतात. दोन्हीकडे लक्ष्म्यांच्या पुढे वेगवेगळ्या प्रकारचे खेळ, त्या लक्ष्मीच्या मुली, असा परिवार असतो. त्याशिवाय वेगवेगळ्या धान्याच्या राशी महालक्ष्मीपुढे ठेवल्या जातात. एकंदरच हा उत्सव शेतीशी निगडित असल्याचं दिसतं.

भारतात भाद्रपदातली ज्येष्ठा गौर महाराष्ट्रातही विविध प्रकारे अवतरते. सालंकृत मूर्तिरूपात अनेक ठिकाणी ती जोडीने येते. ज्येष्ठा आणि कनिष्ठा! बायकांच्या भाषेत सोवळ्यातली आणि ओवळ्यातली. या मूर्तिरूपांना बहुधा महालक्ष्मी, लक्ष्म्या म्हणतात. कोकणात अनेक ठिकाणी एकच मूर्ती असते. कोकण-गोवा प्रदेशात मुखवट्याची एकच गौरीची मूर्ती असते. पण त्याच जोडीला पाणवठ्याकाठी आपोआप उगवलेली रंगीबेरंगी फुलांची तेरड्याची रोपे आणून तीच गौर म्हणून पुजतात. आम्ही लहानपणी या फुलांना गौरीची फुलं म्हणत असू ते का? याचा उलगडा तेरड्याच्या रोपांची गौर पाहिली तेव्हा झाला. बाकी सगळे सोपस्कार मूर्तिरूप गौरींसारखेच! नैवेद्य, जागरण सगळेच!

कोकणस्थ ब्राह्मणात व कर्नाटकात अनेक ठिकाणी पाणवठ्यावरून किंवा तुळशीच्या रोपाजवळचे दोन खडे कलशात घालून मिरवत आणून तेच गौर म्हणून पूजतात. काही ठिकाणी तिला 'गंगा गौर' म्हणतात. खरेतर ही खड्यांची किंवा तेरड्याच्या रोपांचीच मूळ गौर असावी. माणसाच्या भौतिक विकासाबरोबर तिला सालंकृत मूर्तिरूप आले असावे. रूप कसेही असले तरी तिच्या उपासनेचा उल्हास सगळीकडे सारखाच.

# व्यवस्थेला भडाग्नी देणारा कवितासंग्रह : तरंग अंतरीचे

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या आगमनाने मुक्यांना वाचा फुटली. आंधळ्याला दृष्टी आली आणि बहुजन समाज खडबडून जागा झाला. हजारो वर्षांपासून कोंडलेल्या भावनांना, वाट मोकळी करुन देऊ लागला.

आपल्या व्यथा, वेदना मांडू लागला. साहित्याच्या माध्यमातून आपल्या व्यथा सांगू लागला. त्यांच्या शब्दांनी व्यवस्था गर्भगळीत झाली. अण्णाभाऊ साठे, वामनदादा कर्डक, बाबुराव बागुल, दया पवार, वामन निंबाळकर, नामदेव ढसाळ, ज.वि.पवार, अर्जुन डांगळे, गंगाधर पानतावणे अशा असंख्य साहित्यिकांनी शब्दांना शस्त्रे बनविले. त्यांच्या धारदार शब्दांनी अंधारात चाचपडणारा समाज जागा झाला. स्वाभिमानाची भाषा बोलू लागला.

व्यवस्थेच्या विरोधात ते दंड थोपटून उभे ठाकले. बहुजन समाजात ज्यांनी प्राण फुंकला, त्या विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराला प्रमाण माणून परिवर्तनाची वाट चालू लागला. आपल्यावर होणाया अन्यायाला वाचा फोडण्यासाठी कथा, कादंबरी, कविता, नाटक, आत्मचरित्र अशा विविध वाङ्मय प्रकारातून, मनातील भावनांना वाट मोकळी करुन देऊ लागला. परिवर्तनाच्या अनेक आंदोलनातून, व्यवस्थेला हादरे देण्याचे काम करु लागला. असंख्य तरुण लिहिते झाले. त्याच पायवाटेनी सुनिल खंडाळीकर निघाले आहेत. अहमदपूर तालुक्यातील खंडाळी हे गाव दुर्गम भागातील आहे. पण अहमदपूर हे परिवर्तनाच्या चळवळींना गती देणारा तालुका आहे. कवि या तालुक्यातील अनेक सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीतून काम करणारा आहे. त्यामुळे त्या परिसरातील अनुभव त्यांच्या कवितेमध्ये दिसतात. तरंग अंतरीचे' हा कवितासंग्रह घेऊन, माय मराठी साहित्य दरबारात आगमन करीत आहेत. वाचक त्यांच्या कवितांच स्वागत करतीलच अशी आहे.

सुनिल खंडाळीकर हे एक संवेदनशील मनाचा कवी आहे. परिवर्तनाच्या चळवळीत काम करतांना जातीचे चटके कसे असतात ? हे त्यांनी जवळून बघितले आहे. म्हणून, ते म्हणतात -

**जाती अंताचा लढा**
**शतकानुशकते सुरुच हाय**
**तरी पण जातीचा अंत**
**का बरं होत नाय ?**

भारतात असंख्य जाती आहेत. त्या एकमेकांच्या कट्टर शत्रू आहेत. इथे वर्णव्यवस्था अतिशय खोलकर रुजली आहे. माणसाचे कर्म काही का असेना पण, तो जन्मावरुन स्वत:ला श्रेष्ठ समजत जातो. जन्मावरच श्रेष्ठत्व आजही सुरुच आहे. अनेक महामानवांनी तिला हादरे दिले. गौतम बुध्दांपासून ते तुकडोजी, गाडगेबाबा यांच्यासारख्यांनी जातीच्या विरोधात यल्गार पुकारला पण, ती जात आहे काही केल्याने जात नाही. इथे अजूनही घडते खैरलांजी. डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, भारतीय सवर्ण माणूस बाहेर समाजवादी आहे आणि घरात कर्मठ आहे.''



इतरांना तुच्छ मानण्याची वृत्ती, सवर्ण माणसाच्या मनातून जात नाही. जात ही त्याच्या अंगवळणी पडली आहे. अंगवळणी पडलेली गोष्ट सहजासहजी जात नाही. कवीला दलित समाजात जातीवरुन होणारे दमण दिसते आहे. कवि स्वत:च जातीवरुन होणारे संघर्ष बघत आला आहे. इथली जातीच्या चष्म्यातून बघण्याची वृत्ती जात नाही. काही लोक खोडसाळपणानं म्हणतात, आता कुठे जात राहिली आहे ?' पण ते सत्य नाही. जात विचारल्याशिवाय रुम भाडएने मिळत नाही. जात बघितल्याशिवाय, लोक मतदान करत नाहीत. राजकारणी लोक आपल्या स्वार्थासाठी, जात संपविण्याऐवजी ती मजबूत करत सुटले आहेत. जातीच्या घोषणांनी असमंत निनांदतांना दिसतो आहे. जात हे शोषकांचं हत्यार बनलं आहे. देशाची आर्थिक हानी झाली तर, ती भरुन काढता येईल. पण माणसात निर्माण झालेली दरी काही केलं तरी, भरुन काढता येत नाही. हे माहित असतांनाही राजकारणी लोक जात, धर्म अस्मितेचं राजकारण करत सुटले आहेत. एकाधिकारशाही लादण्याचे काम जोरात सुरु आहे. परिवर्तनाचे नवे हत्यार कुठल्या आडगळीत पडले आहे ? कळत नाही. म्हणून कवि बुध्दाच्या भूमीत' या कवितेत म्हणतात -

**इथे बलात्कायांची शिक्षा**
**माफ केली जातेय**
**त्याचा सत्कार केला जातोय**
**त्यांना सांगावं लागेल**
**ही भूमी धर्मांधाची नाही**
**बुध्दाची आहे**

बिल्कीस बानू यांच्यावरील बलात्कायांना मोकाट सोडले जाते. अशा नराधमांचा सत्कार केला जातो. कायद्याचे रक्षकच भक्षक बनत असतील तर, आपण लक्षात घेतले पाहिजे. देश कोणत्या वळणावर आहे. गुन्हेगार सहीसलामत सुटतील, याची पध्दतशीर व्यवस्था केली जाते. ना महिला सुरक्षित आहेत, ना शेतकरी, ना दलित, गुंडाना कायद्याची अजिबात भीती राहिलेली नाही. म्हणूनच कवि अस्वस्थ होऊन वाचकांना प्रश्न करतोय, हा देश हिंसावाद्यांचा नाही. शांती आणि मानवता पेरणाया बुध्दांचा, बसवेश्वरांचा, छत्रपती शिवरायांचा, फुले, शाहू, आंबेडकर, अण्णाभाऊ साठे यांच्यासारख्या महामानवांच्या विचारांचा आहे. अशा हिंसाखोर पक्ष, राजकारणी समाज गुंडापासून जनतेने सावध असले पाहिजे. त्यांचे मनसुभे हाणून पाडले पाहिजते. ज्या मनुस्मृतीत स्त्रीयांना स्थान नाही. राष्ट्रभक्तीच्या नावाखाली समाजत विष पेरुन, माणूस माणसापासून तोडणाया आणि कट्टरतावादाला खतपाणी घालणाया, व्यवस्थेला हुस्कावून लावलं पाहिजे. धर्म आंधळ्यांचा कावेबाजपणा ओळखला पाहिजेत. न्यायासाठी लढले पाहिजे तर बुध्दाची भूमी शाबूत राहणार आहे.

अर्धे इधर अर्धे उधर' अशी अवस्था परिवर्तनाच्या चळवळीची झाली आहे. शहाणे गप्प आहेत. बलवान बाजू देवून आहेत. वळचणीला बसणारे सत्तेचा मलिदा खात आहेत. अशा वेळी आठवतो जो डॉ.बाबासाहेबांचा विचार ते म्हणाले होते, ज्यांना लोकशाही, संविधानाचं महत्त्व कळलं नाही, तेच लोक एक दिवस संविधान उद्धस्त करतील.'' परिस्थिती तशीच दिसते. संविधान जाळलं जात. लोकशाहीच्या मंदिरात होमहवन केले जातेय. दलितांचे हक्क हिसकावले जातांना, संविधानाचे सत्तेतले लाभार्थी मुग गिळून गप्प आहेत. त्यांची मूकसहमती दिसते. म्हणून तर मनुस्मृतीच राज येतांना दिसत आहे. म्हणून कवि खंडाळीकर गुलामीची मानसिकता' या कवितेत म्हणतात -

**संविधानाला साक्ष ठेवून**
**संविधान मोडीत काढायला**
**ते निघालेत**
**आम्ही पाहातच राहिलोय**

संविधानाचे सर्वच खांब उलथून गेले आहेत. संविधानाचे जागले मात्र, मनुच्या चाकरीत मश्गुल आहेत. धर्मसत्तेनं राजसत्तेवर वर्चस्व निर्माण केले आहे. अशा वेळी लोकशाहीच्या मार्गावरुन चालणाया प्रत्येक भारतीयांनी, धर्मसत्तेच्या विरोधात एकत्र येऊन लढले पाहिजे. हा संघर्ष अटळ आहे.

**संघर्ष हा अटळ हाय**
**प्रस्थापिताविरुध्द विस्थापित**
**प्रश्न एवढाच हाय**
**मिसळून एकरुप व्हायचं**
**का लढून मरायचं ?**

हजारो वर्षांपासून भारतात प्रस्थापित व आणि विस्थापित हा न्यायासाठीचा, स्वाभिमानासाठीचा संघर्ष सुरु आहे. प्रस्थापित लोक दमनाला चटावलेले आहेत. चंगळवादी, पाखंडी, दमनाच्या संस्कृतीमध्ये ते कधीच एकरुप होणार नाहीत. विस्थापितांच माणूसपण नाकारलं पण, ते डगमगले नाहीत तर ते लढले. इथला मूळ भारतीय लढावू आहे. हे आपण समजून घेतले पाहिजेत.

कवि सुनिल खंडाळीकर यांना राजकारण समाजकारणाचा चांगलाच अनुभव दिसतोय. म्हणून तर राजकारण्यावरती शब्दांचे आसूड ओडतांना दिसतात. बा शिवबा' या कवितेत ते म्हणतात -

**बा, शिवबा**
**तू स्वराज्याचा शिल्पकार**
**रयतेचा राजा**
**आम्ही मारतो मजा**
**तुमच्या नावावर ....**

भारतीय राजकारणी माणूस ढोंगी, लबाड आणि स्वार्थी आहे. जसे रंग वाटले तसे महामानवही प्रत्येक जातीत वाटले गेले आणि आपल्या स्वार्थापायी त्यांचा वापर आपल्या सोईनुसार केला जात आहे. महापुरुषांची नावं फक्त तोंडी लावण्यापुरती घ्यायची आणि कृती मात्र त्याच्या विचाराच्या विरोधात करतात. हे आपण समजून घेतले पाहिजेत. बहुजन महानायकांना जाणीवपूर्वक बदनाम केले जात आहे. त्यांना फक्त डोक्यावर घेऊन नाचणारी, विचारशून्य आंधळे भक्त तयार करण्याचं काम जोरात सुरु आहे.

सद्याचं राजकारण दगाबाजीचं आहे. सुडाचं आहे. सेवा नाही तर, हुकुमशाही सुरु आहे. साम, दाम, दंड, भेद यांचा वापर सुरु आहे. जे विरोधात बोलतील ते जेलात असतील. धनाच्या जोरावर विरोधकांची सत्ता हिसकावली जातेय, म्हणून कवि सुगी' या कवितेत म्हणतात -

**आवंदा गद्दारीच पिक**
**जोरात हाय**
**ईडी नावाचं फवारणीचं औषध**
**चांगलंच जोमात हाय !**

सद्याचं राजकारण वस्तूनिष्ठतेकडून, व्यक्ती निष्ठतेकडे जात आहे. लोकशाही शोषितांच्या मुक्तीसाठी असते. पण घडते भलतेच आहे. हिंदुत्ववादी शक्तीचा लोकशाहीला उद्धस्त करुन, लोकांना गोगलगाय बनवलं जात आहे. जातीच्या अस्मिता टोकदार बनवल्या जात आहेत. संविधानिक पदावर बसणारी नेतेमंडळी, लोकशाहीच्या मंदीरात धर्माचा गोंधळ घालत आहेत. समाजाची बांधिलकी आता सत्ताधायांना राहिली नाही. लोकशाही मनुवाद्यांच्या चक्रव्युहात सापडलेली आहे. काल विरोधात असणारे आज भयापोटी, हुकूमशाहीच्या पायावर लोटांगण घालत आहेत. सत्तापिपासू लोकांना देशांच काही देणंघेणं नाही. म्हणून लोकांनी सत्ताधायांच्या, धनदांडग्याच्या कुठल्याच अमिषाला बळी न पडता गद्दार, चरित्रहीन लोकांना निवडून देता, समाजभान आणि जाण असणाया लोकांना निवडून देवून, देश धर्मांध हुकूमशाहीच्या कचाटएतून बाहेर काढण्यासाठी तयार असूयात.

महात्मा जोतीबा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर या महामानवांनी मनुस्मृतीच्या कचाटएतून देश बाहेर काढला. स्त्री शिक्षणाची मुर्हुतमेढ रोवली. स्त्री शिक्षणाकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. हे त्यांनी ओळखले. शिक्षण हे विकासाची चावी आहे. शिक्षणाने सगळेच टाळे खोलले जाऊ शकतात. असे असतांनाही मनुस्मृती शिकविते. स्त्रियांना घरातच नाही, तर कुठेच स्वातंत्र्य देऊ नका. तिच प्रवृत्ती समाजात, घराघरातून दिसून येते. म्हणून कवि मी बी शिकावं म्हणतो':

**मी म्हणाले,**
**मला पुढे शिकायचं हाय**
**मला उत्तर मिळाले**
**तुझ्या शिक्षणाचा खर्च**
**मला झेपणार नाय ...**

आजही समाजात शिक्षणाबाबत उदासिनता आहे. इच्छा असूनही मुलींना शिकू दिलं जात नाही. एकीकडे बेटी बचावो, बेटी पढाओ' म्हणायचं आणि जाणीवपूर्वक शिक्षण क्षेत्राकडे कानाडोळा करुन, शिक्षण क्षेत्र धनदांडग्याच्या हातात (पान ३ वर)

# राजे उमाजी नाईक हे स्वातंत्र्यासाठी १८ व्या शतकात इंग्रजांशी लढणारे आद्यक्रांतीवीर-गुणवंत मिसलवाड



नांदेड- भारताच्या इतिहासात अनेक ऐतिहासिक घटना घडल्या. काहींची इतिहासात नोंद झाली तर काही क्रांतीविरांची दखलच घेतली गेली नाही. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्य विचारावर प्रभावित होऊन १८ व्या शतकात ब्रिटीशांशी लढणारे थोर आद्यक्रांतीवीर म्हणजे नरवीर राजे उमाजी नाईक हे होत असे प्रतिपादन एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते मा. श्री. गुणवंत एच. मिसलवाड यांनी केले. ते महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी डेपो) नांदेड आगार येथे दि. ७ सप्टेंबर २०२४ शनिवार रोजी सकाळी ठिक १०.३० वाजता सशस्त्र क्रांतीचे प्रथम जनक, इतिहासातील शूर लढवय्या, आद्यक्रांतीवीर, नरवीर राजे उमाजी नाईक यांच्या २३३ व्या जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या अभिवादन सोहळा कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते.

पुढे बोलताना ते आपल्या भाषणात म्हणाले की, १८५७ च्या उठावा अगोदर राजे उमाजी नाईक यांनी सलग १४ वर्षे इंग्रजांना सळो की पळो करुन पळता भुई करुन सोडले होते व एक वर्षे जेलही झाली. जेलमधून सुटल्यावर साथीदारांना सोबत घेऊन इंग्रजांचा खजिना लुटून सामान्य जनतेला वाटला. ४१ वर्षाच्या आयुष्यात रयतेची प्रामाणिक कार्य सेवा करुन भारत देश स्वातंत्र्यासाठी आहुती दिली. अशा या महान क्रांतीकारकाचा इतिहास युवा पिढीने वाचन करून समाजाप्रति देशाप्रति आदर्शयुक्त कार्य करण्याची ही काळाची गरज आहे, असेही ते यावेळी म्हणाले.

सर्वप्रथम सहाय्यक कार्यशाळा अधीक्षक मा. श्री. श्रीनिवास रेणके यांच्या हस्ते आद्यक्रांतीवीर, नरवीर उमाजी नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन करुन पुष्पमाला अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून सहाय्यक कार्यशाळा अधीक्षक मा. श्री. श्रीनिवास रेणके, पाळी प्रमुख अविनाश भागवत, एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते गुणवंत एच. मिसलवाड, वरिष्ठ लिपीक सौ. सुनीता हुंबे, मनिषा कदम, छायाचित्रकार केशव टोनगे, कामगार नेते आतिश तोटावार, हेड कॅशिअर सुमीत महाजन, माजी चालक बि.एम. संपत यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी रा.प. म. आगारातील कामगार कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चेअरमन गोविंदराव माकणे यांच्या हस्ते विशाल कार्यकारी सेवा सोसायटीच्यावतीने शिक्षकांचा सन्मान



चाकूर(प्रतिनिधी): शिक्षकांच्या आशीर्वादामुळे जीवन प्रकाशमय होते. जीवनातील अधंकार दुर करण्यांचे काम शिक्षक करतात. या सर्व शिक्षकांनी दिलेल्या ज्ञानाच्या शिदोरीवरच विद्यार्थीचे उज्वल भवितव्ये घडत असते. शिक्षक हे समाजाचे दिशादर्शक असतात, असे प्रतिपादन सोसायटीचे चेअरमन डॉ. गोविंदराव माकणे यांनी अध्यक्षीय समारोपात केले.

विविध विशाल कार्यकारी सेवा सोसायटीच्यावतीने आयोजीत शिक्षकदिनाच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. तर प्रमुख वक्ते म्हणुन व्यासपीठावर डॉ. राजेश तगडपल्लेवार, तर प्रमुख पाहूणे म्हणुन व्हाईस चेअरमन बालाजी तलवारे, संचालक राधाकिशन तेलंग, शिरीष येडले, अजय नाकाडे, मन्मथ पाटील, दिगांबर मोरे, हनमंत उस्तुर्गे, दिलीप गोलावर यांची उपस्थिती होती. याप्रसंगी प्रमुख वक्ते डॉ. तगडपल्लेवार यांनी शिक्षक हा देशासाठी सुजाण नागरिक घडविण्यांचे काम करतो. यासाठी तो जीवनभर ज्ञानदानाचे कार्य करीत असतो.

देशाचे उज्वल भविष्य घडविण्यांसाठी शिक्षक सातत्याने धडपडत असतो. तसेच शेतकऱ्यांची ही सोसायटी म्हणजे सहकार क्षेत्रामध्ये नावलौकिक असलेली व नुकताच आयएसओ दर्जा प्राप्त केलेली विशाल कार्यकारी सोसायटी असुन इथे दरवर्षी शेतकऱ्यांचा सन्मान केला जातो. या वर्षी दि. ५ सप्टें रोजी शिक्षक दिनी सेवानिवृत्त ६१ शिक्षकांचा सत्कार करण्यात आला हे गौरवाचे असल्याचे शेवटी नमुद केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी शिक्षकांचे आदर्श डॉ. सर्वपल्लि राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पुजन मान्यवराच्या हस्ते करण्यांत आले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक संचालक शिरीष रेड्डी यांनी केले. याप्रसंगी सेवानिवृत्त शिक्षक सर्वश्री नागनाथ उत्सुर्गे, त्रिंबक स्वामी, मधुकर पाटील, ईश्वर पाटील, रघुनाथ मोरगे, व्यंकट धोंडगे, ज्ञानोबा लोखंडे, काशिनाथ पाटील, ज्ञानोबा इंद्राळे, बाबुराव ढोबळे, धोंडीराम तोंडारे, रामचंद्र नरवटे, नागभूषण पाटील, संजय स्वामी, शेषराव धोंडगे, अ. ना. शिंदे, विजयकुमार कुलकर्णी, महबूब खेडकर, शंकर गादगे, विजयकुमार जोशी, गणेश पटणे, सोनटक्के गुरूजी यांचा सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी शेतकरी, शिक्षक यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हक्कानी सौदागर यांनी केले. उपस्थिताचे आभार व्यवस्थापक कपिल आलमाजी यांनी मानले.

## श्री महात्मा बसेश्वर शिक्षण संस्थेला महिला ....

(पान १ वरून) स्त्रियांचा सन्मान केला. महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेने महिलांचा सन्मान करण्यासाठी स्वतंत्र अशा महिला महाविद्यालयाची मागणी केल्यास त्याला मान्यता मिळवून देण्यासाठी मी प्रयत्नशील राहील, असेही ते म्हणाले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर म्हणाल्या की, वीरशैव लिंगायत समाज हा भारतभर विखुरलेला समाज आहे. या समाजाला एकत्रित बांधण्यासाठी खासदार अजितजी गोपछडे प्रयत्नशील आहेत. वीरशैव लिंगायत सन्मान यात्रेच्या माध्यमातून समाजाला एक नवी दिशा, नवी आशा, नवी उमेद निर्माण करण्याचा प्रयत्न होत आहे, असेही त्या म्हणाल्या.

यावेळी बोलताना शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर म्हणाले की, लिंगायत समाज हा भाषिक दृष्ट्या अल्पसंख्यांक असा समाज आहे.

या समाजाला भाषिक अल्पसंख्यांकांचा दर्जा मिळावा, महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था ही महात्मा बसवेश्वरांच्या आचार विचार प्रेरणेतून निर्माण झालेली शिक्षण संस्था आहे. या शिक्षण संस्थेला विद्यापीठाचा दर्जा मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जावेत, जेणेकरून समाजातील बहुजनांना शिक्षणाचे द्वारे खुली होतील, असेही ते म्हणाले.

यावेळी बोलताना शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे म्हणाले की, महात्मा बसवन्नाचा कायकाचा विचार शिक्षण संस्था प्रत्यक्षात राबवण्याचा प्रयत्न करीत आहे. समाजात विधायक कार्य करण्यासाठी सर्व संचालक मंडळ शिक्षण संस्थेच्या सर्व शाखा उपशाखा श्रम हाच परमेश्वर माणुन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा प्रयत्न करीत आहे.

त्याचबरोबर समाज परिवर्तनाचा ही प्रयत्न करत आहे, असे ते म्हणाले या कार्यक्रमाचे प्रास्ताविक वीरशैव लिंगात सन्मान यात्रेचे प्रमुख संयोजक नितीन भाऊ शेटे यांनी केले. तर आभार प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी मानले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. रत्नाकर बेडगे व डॉ. राहुल डोंबे यांनी केले. या कार्यक्रमाला शहरातील अनेक लिंगायत कार्यकर्ते, महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डॉ.बी.आर.आंबेडकर ...

(पान १ वरून) कामकाज हे विद्यार्थ्यांकडूनच करून घेतले जाते.शिवाय कमवा व शिका या संकल्पनेतून बँकेत काम करणाऱ्या विद्यार्थ्यांना दरमहा पगार दिला जातो असे मार्गदर्शक अंबादास धिवार यांनी सांगितले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक जयपालसिंग जमादार सर, वसतीगृह अधिक्षक सतीश रेनेवाड सर, महीला पालक प्रतिनिधी प्रमीला साबळे मॅडम ,बँकेचे मार्गदर्शक अंबादास धिवार सर,विनोद भोरे सर,भरत आंधळे सर, उषा वाघ मॅडम, ज्योती पताळे मॅडम, गायकवाड मॅडम, धनराज बुलबुले सर, राठोड सर, वाघमारे सर, मस्के सर, बनसोडे सर व विद्यार्थी उपस्थित होते.

प्रमुख उद्घाटक विहंग नारंगकर यांनी विद्यार्थ्यांना आर्थिक नियोजन, राष्ट्रीयकृत बँकांचे व्यवहार, आर्थिक तेजी मंदी या विषयावर सविस्तर माहिति देऊन आर्थिक साक्षरतेचे महत्व पटवून दिले.तसेच बँक ऑफ महाराष्ट्र तर्फे विहंग नारंगकर यांनी विद्यार्थी सहकारी बँकेस ५०००/- रुपयांची देणगी दिली. महिला पालक प्रतिनिधी प्रमीला साबळे यांनी विद्यार्थ्यांना आर्थिक बचत करण्याचे आवाहन केले.तर अध्यक्षीय समारोपात मुख्याध्यापक जयपालसिंग जमादार यांनी विद्यार्थ्यांना भविष्यातील बँकींग क्षेत्रातील संधी व करीअर या बद्दल मार्गदर्शन केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी परीश्रम घेतले.

## 'दक्ष' आपत्ती व्यवस्थापन परिषदेत डॉ.उस्मानी सन्मानीत

लातूर : आपत्ती व्यवस्थापनामध्ये आणीबाणीच्या वेळी योग्य निर्णय घेऊन तात्काळ प्रतिसादाच्या सेवेसाठी लातूरचे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ. साकेब उस्मानी यांना छत्रपती (पान ४ वर)



# सुप्रभात वैभव पेपरचे लातुरात प्रकाशन, हा पेपर लातूर, सोलापूर, धाराशिव, नांदेड जिल्ह्यात जाणार



लातूर - येथुन प्रकाशित होणा-या साप्ताहिक सुप्रभात वैभव या वर्तमानपत्राचा दिनांक ८ सप्टेंबर २०२४रोजी लातूर येथील पत्रकार भवन येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष संजय शेटे यांच्या हस्ते तसेच एडवोकेट मल्लिकार्जून करडखेलकर पेपरचे प्रकाशक प्रा सुदर्शनराव बिरादार सर यांच्यासह अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले. हे साप्ताहिक लातूर, सोलापूर धाराशिव व नांदेड जिल्ह्यात जाणार आहे.

अतिशय दर्जेदार व१६पानी रंगीत साप्ताहिक असल्याने सर्व मान्यवरांनी पेपरचे कौतुक केले.व शुभेच्छा दिल्य या बैठकीच्या अध्यक्षस्थानी लिंगायत महासंघाचे प्रदेशाध्यक्ष प्रा सुदर्शनराव बिरादार सर हे होते.

तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पार्टीचे जिल्हाध्यक्ष संजय शेटे, उदगीर विधानसभा मतदारसंघाचे संभाव्य उमेदवार मल्लिकार्जून करडखेलकर, लिंगायत महासंघाचे जिल्हाध्यक्ष करिबसवेश्वर पाटील, जिल्हा संघटक काशिनाथ मोरखंडे, जिल्हा सरचिटणीस चंद्रकांत तोळमारे, जिल्हा उपाध्यक्ष चंद्रकांत कोरे, जिल्हा कोषाध्यक्ष माणिक मरळे, सह कोषाध्यक्ष शिवदास लोहारे, चाकुर तालुकाध्यक्ष सुभाष शंकरे, चाकुर शहराध्यक्ष संजय पाटील,अशोक काडादी ,एन.आर.स्वामी,प्रा एम बी पठाण, विश्वनाथ मिटकरी, राजकुमार मुरगे,पत्रकार शेरखाने, विश्वनाथ बिरादार, एम बी मिटकरी गणेश कोवळे, सिद्धेश्वर वाघाळे,रवि हिरास,जी जी ब्रम्ह वाले, गणेश स्वामी, विश्वनाथ सावळे स्वामी ,हेमंत नेलंवाडकर यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.या कार्यक्रमाचे नियोजन लिंगायत महासंघाचे शहराध्यक्ष शिवदास बुलबुले व शहर उपाध्यक्ष दयानंद दरेकर यांनी केले.कार्यक्रमाचे सुत्र संचालन किशन कोलते यांनी केले तर आभार चंद्रकांत कोरे यांनी मानले.

# अज्ञान आणि अंधश्रध्देचे उदात्तीकरण करून जगात कोणतेही राष्ट्र प्रगती करू शकत नाही

## निवृत्त गटविकास अधिकारी वसंतराव वाघमारे

लातूर : अज्ञान आणि अंधश्रद्धांचे उदात्तीकरण करून, जगातील कोणतेही राष्ट्र अपेक्षित पगती करू शकत नाही असे प्रतिपादन, पूर्व प्राध्यापक तथा सेवा निवृत्त गटविकास अधिकारी वसंतराव वाघमारे येरमाळकर यांनी केले. ते शिक्षक दिनानिमित्ताने विवेकानंद चौक लातूर येथे, आयोजित करण्यात आलेल्या ज्ञान गौरव प्रसंगी बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सरपंच श्री माधवराव गायकवाड येळीकर हे होते.



यावेळी पुढे बोलताना प्रा. वसंतराव वाघमारे म्हणाले की, अविवेकी हित संबधातून थोपलेल्या अज्ञानातील कालबाह्य रुढी- परंपरा या, विचार आणि व्यक्ती स्वातंत्र्यावर भयंकर आघात करतात. इतकेच नव्हे तर, त्यामुळे समाजातील प्रतिभा, संकल्प आणि स्वप्नाचाही संकोच केला जातो. म्हणून मानवी समाजात ज्ञानाचे स्वागत करणारी मनिषा आपण सर्वत्र जागऊ या असेही वाघमारे म्हणाले. प्रारंभी ए. युव. स्माल फायन्स बँक शाखेच्यावतीने, शिक्षक दिनानिमिताने शिक्षण क्षेत्रातील प्रा.व्ही.डी. वाघमारे व गोपाळराव चिकाटे यांना, मेजर श्री संभाजीराव दोरवे आणि श्री सुधाकर कांबळे यांच्या हस्ते, सर्वपल्ली डॉ. राधाकृष्णन यांची प्रतिमा व गुलाब पुष्प देऊन गौरविण्यात आले. या समई गणपतराव तेलंगे, सुभाष निबांळकर, चिकाटे व माधवराव गायकवाड यथोचित भाषणे झाली.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक लातूर शाखेचे उप- व्यवस्थापक श्री ज्ञानेश कोंडजी पाटील यांनी केले. तर ॲड. सुरेशराव शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. आणि संजय व्यवहारे यांनी आभार प्रदर्शन केले. या प्रसंगी निवृत्त पोलिस अधिकारी श्री शंकरराव तरुडे, सामाजिक कार्यकर्ते रामकुमार रायवाडीकर, दिगंबरराव बारसकर, बापूराव गायकवाड, माधवराव सुर्यवंशी, दिगंबरराव भोसले, मुन्ना पांचाळ, गुलाबराव बिरादार, गोपाळराव माडीबोयणे, निवृत्त शिक्षण विस्तार अधिकारी श्री दगडूजीराव सोनवणे, बी जी बनसोडे, एस के स्वामी आदी उपस्थित होते.

# महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात राजे उमाजी नाईक यांची जयंती साजरी



लातूर : श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, आयक्युएसी, जयंती उत्सव समिती आणि विज्ञान शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाच्या प्राचार्य कक्षात राजे उमाजी नाईक यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई हे होते. यावेळी विज्ञान शाखासमन्वयक प्रो. डॉ. सिद्राम डोंगरगे, उपप्राचार्य प्रा. संजय पवार, प्रा. बालाजी जाधव, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. आनंद शेवाळे, जयंती समितीचे समन्वयक डॉ. धोंडीबा भुरे, प्रा. एन.पी. दलगडे, प्रा. एस. एस. जाधव, डॉ. प्रशांत कोरे, डॉ. गजानन खेत्री, प्रा. पूजा घार, प्रा.राम पाटील, प्रा.पूनम शेळके, प्रज्योत भुरे उपस्थित होते.

यावेळी प्रा. अभिषेक कांबळे, डॉ. घनश्याम ताडेवार, उपप्राचार्य प्रा. संजय पवार, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे यांनी राजे उमाजी नाईक यांच्या जीवनपटावर प्रकाश टाकला. या कार्यक्रमचा अध्यक्षीय समारोप प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी केला तर सूत्रसंचालन आणि प्रास्ताविक डॉ. सिद्राम डोंगरगे यांनी केले तर आभार कार्यालयीन प्रमुख नामदेव बेंदरगे यानी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विनायक लोमटे, योगीराज माकणे, आनंद खोपे, संतोष राठोड यांनी परिश्रम घेतले.

## व्यवस्थेला भडाग्नी देणारा कवितासंग्रह ...

(पान २ वरून) देऊन, शिक्षणाचा बाजार मांडायचा. कशा शिकणार मुली? पुरुषी मानसिकता एवढी सडलेली असेल आणि खुनी, बलात्कायाच्या मिरवणूका काढल्या जात असतील. त्यांना सजा न होता सहीसलामत मोकाट सोडलं जात असेल तर, मुलींना कोण शाळेत पाठविल ? प्रत्येक क्षेत्रातील स्त्री ही शोषित आहे. स्त्रीयांची नग्न धिंड काढली जात असेल, तर देश कुठल्या वळणार आहे? हे सांगायची गरज नाही. स्त्री शिक्षणाबद्दल समाजात उदासिनता पसरत आहे. हे कवीने अतिशय मार्मिक शब्दात सांगितले आहे. काही झालं तरी, स्त्री शिक्षणाची चळवळ गतीमान झाली पाहिजे. भारत हा कृषीप्रधान देश आहे. त्यातूनच असंख्य लोकांची उपजिवीका भागवली जात असते. तो राबतो आणि जगाला जगवतो, तोच अनेक वर्षांपासून आत्महत्या करतोय. हे मात्र झापडबंद सरकाराला दिसत नाही. शेतकयांच्याच विरोधी कायदे करुन, त्यांची शेती काढून घ्यायची, ही व्यवस्था केली जात आहे. कधी आंदोलने केलीच तर, ती सर्व ताकदीनीशी मोडून काढली जात आहेत. त्यांनी आपल्या मागण्या मागितल्या तर, त्यांच्या मार्गात खिळे ठोकले जात आहेत. अश्रुधुरांच्या नळकांडए फोडल्या जात आहेत. लाठीचार्ज केला जातोय. अशा वेळी कवींची लेखनी सरसावते न्यायासाठी -

**भाकरीची किंमत**
**तुला नाही कळायची**
**पोटातील आग**
**तिच्या बिगर नाही विझायची**

न मागता भांडवलदारांची कर्जे माफ करायची आणि ताटात भाकर देणायावर गाडए चालवायच्य, हा फॅसीझम एकजुटीने मोडून काढला पाहिजे. कारण शेतकरी सुखी तर देश सुखी. नुसत्या जाहीरातीने देश विकसित होणार नाही. भांडलवादाराच्या खिशात बसणाया सरकारांना शेतकयांच्या व्यथा, वेदना कळणार नाहीत. त्यासाठी भाकरीशी बेईमानी करणाया सरकारांना त्यांची जागा दाखवावी लागेल. बळीला पाताळात गाडणारी व्यवस्था उद्ध्वस्त करुन, बळीच राज्य आणावे लागेल. त्याशिवाय ऐतखाऊंना भाकरीची किंमत कळणारच नाही.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मनुस्मृती जाळली, पण मनू जीवंत राहीला. म्हणून तर आधुनिक भारतात कट्टरतावाद झपाटएने फोफावला जात आहे. माणसात धर्माचं विष पेरुन, माणसं माणसापासून तोडली जात आहेत. व्देषामुळे माणसातील माणूसपण, जाऊन पशूपण येत आहे. एखादा देश धार्मिक झाल्याने, सर्वच प्रश्न सुटणार आहेत का ? मग जगात अनेक देश धार्मिक आहेत. त्यांची अवस्था आपण बघतच आहोत. व्देष पसरवणारे फक्त व्देषच पसरवतात. त्याशिवाय, ते काहीच करु शकत नाहीत. हा मनुवादी कावा बहुजनांनी वेळीच ओळखून, लोकशाहीच्या बाजून दंड थोपटून उभे राहिले पाहिजेत. अर्थसंकल्प' या कवितेत कवी म्हणतात -

**ते पुन्हा पुन्हा सांगत आहेत**
**हिंदुत्वाचा स्वीकार करा**
**नाही तर पाय खोरुन मरा**

जे दमनशाही मान्य करतील तेच जगतील नाही तर दाभोळकर, पानसरे, कलबुर्गी, गौरी लंकेश व्हावं लागेल. असा इशारा लोकशहीवाद्यांना दिला जातोय, हे कवी अधोरेखित करतो. लोकशाही धोक्यात आहे. हेच कवीला सूचवायचं आहे.कवि सुनिल खंडाळीकर हे अतिशय संवेदनशील मनाचे कवि आहेत. त्यांची नाळ सामाजिक परिवर्तनाशी जुळल्यामुळेच, त्यांच्या ह्मदयात सामान्य माणसांबद्दल कळवळा दिसून येतो. त्यांच्या धमण्यात विद्रोही रक्त वाहताना दिसते. ते आपल्या कवितेतून, समतेचा जागर घालतांना दिसतात. फुले, शाहू, आंबेडकर, अण्णाभाऊ साठे यांच्या पायवाटेने जाणारा हा कवी आहे. आपण कोणत्या साहित्य प्रवाहातील लेखक आहोत, याची जाणीव त्यांना निश्चितच आहे. म्हणूनच त्यांच्या कवितेतून लोकशाही मूल्यावरच्या त्यांच्या निष्ठा स्पष्ट दिसतात. लोकशाहीचं स्वत्व जाणणा-या कवीस माझ्या शुभेच्छा...!

**- अंकुश सिंदगीकर,**
शाहीर निवास, संघर्ष नगर, उदगीर.
मो.८८८८१८०८३७

# लातूर येथील बिर्ला ओपन माईंड्स इंटरनॅशनल स्कूलचे गणपती कार्यशाळेमध्ये घवघवीत यश



लातूर(प्रतिनिधी): लातूर येथे रोटरी क्लब आणि स्टीम एज्युकेशन यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या गणपती कार्यशाळा या स्पर्धेमध्ये विविध वयोगटात मध्ये घेण्यात आलेल्या स्पर्धेमध्ये बिर्ला ओपन माईंड्स इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.

यामध्ये चार ते दहा या वयोगटामध्ये प्रथम क्रमांक ईशांन शिंदाळकर तसेच द्वितीय क्रमांक ओजस्वी परीहार यांनी पटकविला आणि वयोगट ११ ते १५ या गटामध्ये प्रथम क्रमांक सार्थक आडे तसेच द्वितीय क्रमांक मृणाल काथार यांनी मिळवला या स्पर्धेमध्ये एकूण सहा पारितोषिका पैकी चार पारितोषिक हे बिर्ला ओपन माईंड्स इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी मिळवले आहेत.

या स्पर्धेसाठी शाळेतील कलाशिक्षक महेश शिंदे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे या मिळालेल्या मुलांच्या यशाबद्दल शाळेचे अध्यक्ष संभाजी सुळ सर, सीए दिगंबर साके सर, सीए संभाजी सरडे सर, एडवोकेट सचिन सुळ सर, प्राचार्य अनिल पोल, उप प्राचार्य अजय शर्मा सर, तसेच शाळेतील शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे खूप कौतुक केले आहे.

# राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याहस्ते विश्वशांती बुद्ध विहाराचे लोकार्पण



उदगीर : उदगीर येथील तळवेस परिसरातील नवनिर्मित विश्वशांती बुद्ध विहाराचे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याहस्ते आज लोकार्पण झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन, विशेष अतिथी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले होते. कार्यक्रमास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, ग्रामविकास तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीष महाजन, क्रीडा मंत्री संजय बनसोडे, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, सर्वश्री आमदार विक्रम काळे, रमेश कराड, अभिमन्यू पवार, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांचीही उपस्थिती होती.

सुरूवातीला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याहस्ते कोनशिलेचे अनावरण, फीत कापून विहाराचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी राष्ट्रपती यांनी विहारातील गौतम बुद्ध यांच्या मूर्तीस, तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्प अर्पण करून अभिवादन केले. यावेळी बुद्ध वंदना झाली. वंदनेनंतर उपस्थित बौद्ध भिक्कूंना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू चिवर दान केले. बौद्ध भिक्कू यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना गौतम बुद्धांची मूर्ती भेट दिली. क्रीडा मंत्री बनसोडे यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत केले.

**विहाराची वैशिष्ट्ये** – राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याहस्ते आज लोकार्पण झालेले उदगीर येथील विहार कर्नाटक येथील कलबुर्गीच्या बुद्ध विहाराची प्रतिकृती आहे. एक हेक्टर १५ आर जागेवर या विहाराची उभारणी करण्यात आली आहे. विहारात १२०० अनुयायांची बैठक व्यवस्था असलेले ध्यान केंद्र तयार करण्यात आले आहे. विहार परिसरात प्रवेश करण्यासाठी एक मुख्य प्रवेशद्वार तयार करण्यात आले आहे. या प्रवेशद्वाराची रचना बिहारमधील सांची स्तूपाप्रमाणे करण्यात आली आहे.

# उदगीर येथील लिंगायत वधुवर मेळाव्याच्या तयारीला लागले जिल्हाभराचे पदाधिकारी



लातूर –लिंगायत महासंघाच्या वतीने उदगीर येथे आयोजित करण्यात आलेल्या २९सप्टेंबर २०२४ वधुवर रोजीच्या मेळावा यशस्वीतेसाठी लातूर येथे आज पत्रकार भवन येथे नियोजन बैठक बोलावली होती. या बैठकीत उदगीरचचा वधुवर मेळावा भव्य करण्याचा निर्धार पदाधिका–यांनी केला. त्यासाठी प्रत्येक तालुक्यात नावनोंदणी केली जाणार आहे. यावेळी देवणी तालुकाध्यक्ष म्हणून राजकुमार मुरगे,तर जिल्हा उपाध्यक्षपदी शेषेराव मानकरी यांची निवड करण्यात आली.

या बैठकीच्या अध्यक्षस्थानी लिंगायत महासंघाचे प्रदेशाध्यक्ष प्रा सुदर्शनराव बिरादार सर हे होते. तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पार्टीचे जिल्हाध्यक्ष संजय शेटे, उदगीर विधानसभा मतदारसंघाचे संभाव्य उमेदवार मल्लिकार्जून करडखेलकर, लिंगायत महासंघाचे जिल्हाध्यक्ष करिबसवेश्वर पाटील, जिल्हा संघटक काशिनाथ मोरखंडे, जिल्हा सरचिटणीस चंद्रकांत तोळमारे, जिल्हा उपाध्यक्ष चंद्रकांत कोरे, जिल्हा कोषाध्यक्ष माणिक मरळे, सह कोषाध्यक्ष शिवदास लोहारे, चाकुर तालुकाध्यक्ष सुभाष शंकरे, आदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

यावेळी संजय शेटे यांच्या हस्ते व सर्व मान्यवरांच्या हस्ते साप्ताहिक सुप्रभात वैभवचे प्रकाशन करण्यात आले.यावेळी चाकुर शहराध्यक्ष संजय पाटील,अशोक काडादी ,एन. आर.स्वामी,प्रा एम बी पठाण, विश्वनाथ मिटकरी, राजकुमार मुरगे,पत्रकार शेरखाने , विश्वनाथ बिरादार,गणेश कोवळे, सिद्धेश्वर वाघाळे,रवि हिरास,जी जी ब्रम्ह वाले, गणेश स्वामी, विश्वनाथ सावळे स्वामी ,हेमंत नेलंवाडकर यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे नियोजन लिंगायत महासंघाचे शहराध्यक्ष शिवदास बुलबुले व शहर उपाध्यक्ष बालाजी दरेकर यांनी केले.कार्यक्रमाचे सुत्र संचालन किशन कोलते यांनी केले तर आभार चंद्रकांत कोरे यांनी मानले.

# ज्ञानेश्वर विद्यालयात शिक्षक दिन साजरा



५ सप्टेंबर हा डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. राधाकृष्णन हे एक महान शिक्षक तसेच भारताचे पहिले उपराष्ट्रपती व दुसरे राष्ट्रपती होते. मी शिक्षक आहे, याचा मला सार्थ अभिमान वाटतो. आपण ज्ञानसत्तेचे पाईक आहोत, ही जाणीव ज्यांच्यामध्ये असते तेच खरे शिक्षक असतात.

शिक्षक पद हे अढळ असतं. शिक्षक हा राष्ट्राचे चारित्र्य घडवत असतो. शिक्षकांमध्ये नम्रता, निर्भयता निर्मितीक्षमता, शोधकता आणि सेवाभाव असे गुण असणे अत्यंत आवश्यक आहे.

सोन्याला कोणीही चकाकी आणू शकतो, परंतु जो धातू आपल्या हाती येईल त्याचे जो सोने करतो तोच खरा शिक्षक! हा केवळ व्यवसाय नसून शिक्षकी पेशा आहे, कठोर असे व्रत आहे, सृजनशील मनांना घडवण्याचा तो वसा आहे. एक पुस्तक, एक लेखणी आणि एक शिक्षक हे जग बदलू शकतात. आई वडील मुलांना जीवन देतात, मात्र शिक्षक विद्यार्थ्यांना जीवनाची दिशा देतात!

# शिवाजी शाळेजवळील सरस्वती कॉलनी परिसरात दुर्गंधीचे साम्राज्य पसरले

## नाल्या तुंबल्या असल्या कारणाने डेंग्यूच्या रूग्णांमध्ये वाढ; नागरीकांच्या समस्या सोडविल्या नाहीत तर समाजसेवक नागरीक सुर्यकांत मुंडलिक उपोषणाला बसणार



लातूर : लातूर शहरातील सरस्वती कॉलनी परिसरातील शिवाजी शाळेजवळ मोठ्या प्रमाणात नागरीकांना नागरी समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. या ठिकाणी नाल्या नाहीत. रोड नाही. घरातील पाणी बाहेर रस्त्यावरच नागरीकांकडून सोडले जाते. अपार्टमेंटमधील पाणी नाल्या नसल्याकारणाने रस्त्यावरच साचत असून यामुळे मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरली जात आहे. या ठिकाणाहून ये–जा करणार्या नागरीकांना या दुर्गंधीचा त्रास सहन करावा लागत आहे. या भागात राहणार्या नागरीकांना या दुर्गंधीचा सामना करावा लागत असुन दुर्गंधीमुळे डेंग्यूचे मच्छरांचे प्रमाण वाढले आहे. या मच्छरांमुळे डेंग्युची लागण अनेक नागरीकांना झाली आहे.

वारंवार या भागातील नागरीकांनी नगरसेवकांना भेटूनही त्याचा काही उपयोग होत नाही. कोणी नागरीकांचे म्हणणे ऐकून घेत नाही तसेच लातूर महानगरपालिकेचे उपायुक्त यांना भेटूनही येथील नागरीकांनी निवेदन दिले होते. रस्ते, नाल्या यासाठी पाठपुरावा करूनही कसल्याही प्रकारचा प्रतिसाद या महानगरपालिकेच्या कर्मचार्यांकडून भेटला नाही. या भागातील नागरीक या भागाचे माजी नगरसेवक श्री रवीशंकर जाधव यांना भेटले असता ते अरेरावीची भाषा करतात व तुम्ही या असल्या भागात प्लॉट घेतलाच कशाला? सोयी–सुविधा आहेत नाहीत हे पाहूनच तुम्ही प्लॉट घ्यायचा होता असे उलट नागरीकांनाच सांगतात. पण एक नगरसेवक या नात्याने त्यांनी या भागातील नागरीकांच्या समस्या सोडविणे गरजेचे असतांना ते सोडविताना दिसत नाहीत. यामुळे त्रासुन गेलेले नागरीकांच्या अडीअडचणी लवकरात लवकर सोडविल्या नाहीत तर येत्या आठ दिवसानंतर शिवाजी शाळेच्या समोर सरस्वती कॉलनीच्या बोर्डाजवळ उपोषणास बसणार आहे तरी लवकरात लवकर माझ्या या तक्रारीची नोंद घ्यावी अशी मागणी या भागातील नागरीक समाजसेवक नागरीक सुर्यकांत राघोबा मुंडलिक यांनी केली आहे.

# ज्ञानेश्वर विद्यालयाचे क्रिडा स्पर्धेत यश

लातूर : जिल्हास्तरीय ज्युनियर अँथलेटिक्स चॅम्पियनशिप २०२४.काल उदयगिरी कॉलेज उदगीर येथे संपन्न झाली.या स्पर्धेत आपल्या विद्यालयातील ५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता,सदरील ५ विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत ९ पदकांची कमाई करत घवघवीत यश संपादन केले.

१)प्रतिक गायकवाड ११वी(विज्ञान) उंच उडी–प्रथम. २)आशुतोष कांबळे ११वी(कला) उंच उडी–द्वितीय,लांब उडी–द्वितीय. ३)जाधव बालासाहेब १०वी(ई) उंच उडी–प्रथम,८०मी हार्डल्स–द्वितीय. ४)लोखंडे पुष्कर ९वी(ब) गोळा फेक–द्वितीय. ५)कावळे धनश्री–१२वी वाणिज्य भालाफेक–प्रथम,थाळीफेक– प्रथम.सदरील ५ ही विद्यार्थ्यांची निवड पुणे येथे होणाऱ्या राज्यस्तरीय ज्युनियर अँथलेटिक्स चॅम्पियनशिपसाठी झाली आहे.

सदरील सर्व खेळाडूंचे विद्यालयाचे मुख्याध्यापक आदरणीय श्री.मलवाडे सर विद्यालयाचे उप मुख्याध्यापक आदरणीय श्री.क्षिरसागर सर विद्यालयाचे क्रीडा विभाग प्रमुख श्री.रूकमे सर तसेच आदी मान्यवरांनी खूप खूप अभिनंदन करत पुढील स्पर्धेसाठी खूप खूप शुभेच्छा दिल्या.



# साखर उद्योग गौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल जिल्हा बँकेचे मार्गदर्शक माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांचा जिल्हा बँकेकडून सत्कार

लातूर : राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी लातूर जिल्हा बँकेचे मार्गदर्शक आदरणीय दिलीपराव देशमुख साहेब यांना नुकताच द डेक्कन शुगर टेक्नॉलॉजीस्ट इंडिया पुणे यांच्यावतीने देण्यात येणारा अतिशय मानाचा साखर उद्योग गौरव पुरस्काराने गौरविण्यात आले आहे त्याबद्दल लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वतीने बँकेचे अध्यक्ष आमदार धीरज विलासरावजी देशमुख यांच्या नेतृत्वाखाली शुक्रवारी आशियाना बंगल्यावर जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अँड प्रमोद जाधव व सन्माननीय संचालक मंडळाने माजी मंत्री दिलीपराव देशमुख साहेब यांचा शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी सत्कार सोहळ्यास जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अँड प्रमोद जाधव, जेष्ठ संचालक अँड श्रीपतरावजी काकडे संचालक अशोकराव पाटील निलंगेकर, संचालक अशोकराव गोविंदपूरकर, संचालक पृथ्वीराज शिरसाठ, संचालक एन. आर. पाटील संचालक व्यंकटराव बिरादार, संचालक दिलीप पाटील नागराळकर, संचालक राजकुमार पाटील, संचालक मारोती पांडे. संचालक अनुप शेळके संचालीका सौ स्वयंप्रभाताई पाटील, सौ अनिताताई केंद्रे, कार्यकारी संचालक हणमंतराव जाधव, प्रभाकर केंद्रे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

# ‘दक्ष’आपत्ती व्यवस्थापन परिषदेत ....

(पान ३ वरून) संभाजीनगर येथे सन्मानित करण्यात आले. आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग महाराष्ट्र शासनाच्या वतीने छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील सभागृहात दि. ५ सप्टेंबर रोजी आयोजित ‘दक्ष’ विभागीय आपत्ती व्यवस्थापन परिषद २०२४ मध्ये हा सन्मान करण्यात आला. पारिषदेचे उद्घाटन विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांच्या हस्ते झाले.

खबर से हकीकत तक वृत्तपत्र व शेरखाने परिवाराच्यावतीने...

**भावपूर्ण श्रद्धांजली**



बुध्दवाशी.
गोपाळराव वाघोजी बनसोडे

# राष्ट्रपतीच्या हस्ते सर्वोत्कृष्ट भाषण पुरस्कार मिळाल्याबद्दल ...

(पान १ वरून) मंडळाच्यावतीने माजी आमदार बसवराज पाटील यांच्या अध्यक्षतेखाली कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांच्या प्रमुख उपस्थितीत कासार सिरसी येथे सरस्वती मंगल कार्यालयात भव्य नागरी सत्कार सोहळा संपन्न झाला. तसेच कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांना महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुख्यमंत्री पर्यावरण शाश्वत विकास पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचाही सत्कार करण्यात आला.

आपल्या पहिल्याच टर्ममध्ये कासार सिरसी सारख्या दुर्गम भागाचा स्वतंत्र तालुका निर्मितीसाठी प्रयत्न करून कासार सिरसीत अप्पर तहसील, प्रशस्त बसस्थानक, सार्वजनिक बांधकाम कार्यालय, नवीन प्रशस्त शासकीय विश्रामगृह, महावितरण कार्यालय, शहरांतर्गत पक्के रस्ते सह औसा विधानसभा मतदार संघातील किल्लारी येथे साखर कारखान्याचे पुनर्जीविकरण, मतदारसंघातील शेत रस्त्यांचे जटिल प्रश्न सोडवणे, यासह विविध गावांना कोट्यावधी रुपयांचा निधी उपलब्ध करून इथल्या ग्रामीण भागातील शेतकरी व वंचितांचे प्रश्न विधानसभेत मांडून सर्वांचे लक्ष वेधणारे आमदार अभिमन्यू पवार यांना यावर्षीचा विधानसभा कामकाजातील सर्वोत्कृष्ट भाषणाचा पुरस्कार मिळाला. सत्तेच्या अल्पावधी कार्यकाळात आपल्या विशिष्ट कार्य शैलीमुळे सर्वांच्या मनात घर करणारे अतिशय संवेदनशील व्यक्तिमत्व म्हणून सध्या सुपरिचित असलेले आमदार अभिमन्यू पवार यांच्या कार्याची विधानसभेत विशेष दखल घेण्यात आली.

नुकतेच कासार सिरसिला स्वतंत्र अप्पर तहसील यांना मंजुरी मिळाल्यानंतर यापाठोपाठ कासार सिरसी महसूल मंडळासाठी मंडळ अधिकारी कार्यालयासह परिसरातील २३ गावांसाठी स्वतंत्र तलाठी कार्यालयासाठी तीन कोटी साठ लाखाचा निधी आमदार अभिमन्यू पवार यांनी मंजूर केले आणि याच सत्कार सोहळ्याच्या समवेतच मान्यवरांच्या उपस्थितीत भूमिपूजनाचाही कार्यक्रम पार पडला. यावेळी कासार सिरसी येथे महात्मा बसवेश्वरांचा अश्वारूढ भव्य पुतळा उभारण्यात येणार असल्याची घोषणा आमदार अभिमन्यू पवार यांनी केले.

या कार्यक्रमाप्रसंगी भाजपा जिल्हा उपाध्यक्ष नितीन पाटील, कासार सिरसी मंडळाध्यक्ष ज्ञानेश्वर वाकडे, शहराध्यक्ष मयूर गबुरे, संघटक सल्लागार धनराज होळकुंदे, सर्कल प्रमुख विरेश चिचंनसूरे, महिला मंडळ अध्यक्ष कविता गोरे, जिल्हा सरचिटणीस कल्पना ढविले, सभापती चंद्रशेखर सोनवणे, संगायो समितीचे अध्यक्ष काकासाहेब मोरे, शेषराव मोहिते, बाजार समितीचे संचालक युवराज बिराजदार, प्रकाश अष्टे, गोविंद भोसले, प्रकाश काकडे, सरपंच गुरुलिंग वाकडे, सरपंच दाऊद सय्यद, संजय कुलकर्णी, ज्योती शिंदे, ज्योती कलशेट्टी, बळवंत पाटील, उपसरपंच बालाजी बिराजदार, उपसरपंच श्रीमंत मोरे, सरपंच मोहन कुनाळे, सरपंच बालाजी मोहिते, सरपंच मल्लिकार्जुन दानाई, सरपंच अनिल पाटिल, पटेल सल्लाउदिन, व्यंकट जाधव, जिलानी बागवान, ओम बिराजदार, सोनाली हाडोळे, कल्पना गायकवाड, वामन मुळे, परमेश्वर बिराजदार, किरण किवडे, नाना धुमाळ, भास्कर पाटील, बंडाप्पा फुलारी, ज्ञानेश्वर बिराजदार, मनोज सलगर, मौला पटेल, दीपक ढविले सह कासार सिरसी मंडळातील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, महिलावर्ग व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्रक मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी प्रकाशक, संपादक, मालक शिरीषकुमार तुकाराम शेरखाने यांच्यासाठी मयुर प्रिंटर्स, बी–२८, एम.आय.डी.सी., लातूर येथे मुद्रित करून ऋतूप्रेम, मुक्ताई नगर,एस.टी.वर्कशॉप पाठीमागे, अंबाजोगाई रोड, लातूर. जि.लातूर ४१३५१२(महा.) येथे प्रकाशित केले. संपादक – शिरीषकुमार तुकाराम शेरखाने, मो. : 9049844412 आर.एन.आय.नं. RNI No. : MAHMAR/2023/86200
PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD AND PUBLISHED AND OWNED BY SHIRISHKUMAR TUKARAM SHERKHANE AND PRINTED AT MAYUR PRINTERS, B-28, M.I.D.C.,LATUR -413512 (MAHA.)AND PUBLISHED AT RUTUPREM, MUKTAINAGAR, AMBAJOGAI ROAD, BEHIND S.T.WORK SHOP LATUR DIST. LATUR - 413512 (MAH.) EDITOR : SHIRISHKUMAR TUKARAM SHERKHANE RNI No. : MAHMAR/2023/86200